JYOTI

स्मार्टकेम टेक्नॉलॉजीज् लिमिटेड, पुणे



# वनस्पती पान देठ (पेटीओल) परीक्षण प्रभावी अन्नद्रव्य व्यवस्थापनासाठी महत्त्वाचे

**वनस्पती पान देठ परीक्षण –** पीक पोषण व्यवस्थापनातील एक प्रभावी माध्यम. पिकांच्या उत्तम व काटेकोर व्यवस्थापनात पान देठ परीक्षणास अनन्यसाधारण महत्व आहे. म्हणुनच महाधन ज्योतीच्या या आवृत्तीत वनस्पती पान देठ परीक्षण विषयक माहिती अंतर्भूत केलेली आहे.

## पान देठ (पेटीओल) परीक्षण म्हणजे काय?

पान देठ परीक्षण हे मुख्यतः उभ्या पिकातील अन्नद्रव्यांची स्थिती पाहण्याकरिता केलेले प्रयोगशाळेतील परीक्षण होय.

## पान देठ (पेटीओल) परीक्षणाचे फायदे काय आहेत?

- पीक वाढीच्या ठराविक अवस्थेत मुळांवाटे होणारे अन्नद्रव्यांचे शोषण पुरेसे आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी या परिक्षणाची मदत होते.
- पिकांमधील न दिसणाऱ्या अन्नद्रव्यांची कमतरता जाणून घेण्यासाठी या परिक्षणाची मदत होते.
- हे जमिनीद्वारे व इतर माध्यमातून अन्नद्रव्यांची जैविक पद्धतिने होणारी उपलब्धता दर्शविते .
- हे उभ्या पिकांमध्ये अन्नद्रव्यांची कमतरता आढळल्यास त्यावर त्वरित उपाययोजना करण्यास मार्गदर्शक ठरते .

## ऊस, टोमॅटो, द्राक्षे, डाळिंब, आंबा आणि केळी या वेगवेगळ्या पिकांमध्ये पानदेठ नमुना घेण्याची शिफारस केलेली पद्धत काय आहे?

नमुना घेण्याची वेळ व पिकातील नमुना घेण्याचा भाग प्रत्येक पिकासाठी विशिष्ट असतो. खाली पिकवार नमुना घेण्याची पद्धत दिलेली आहे

| पीक | नमुन्यासाठी वनस्पतीचा भाग, वय व अवस्था |
|---|---|
| द्राक्षे | एप्रिल छाटणीनंतर ४५ दिवसांनी फ्रुट बड डिफरनशिएशन अवस्थेत काडीच्या तळापासून ५ व्या पानाच्या देठाची नमुन्यासाठी निवड करावी व ऑक्टोबर छाटणीनंतर ४५ दिवसांनी ब्लुम (फुलोरा) अवस्थेत घडाच्या विरुद्ध बाजूच्या पानाचे देठ नमुन्यासाठी घ्यावेत |
| डाळिंब | बहार धरल्यापासून फुलोऱ्याच्या अवस्थेत शेंड्यापासून मोजणी करून आठव्या पानाची जोडी नमुना म्हणून घ्यावी |
| केळी | शक्यतो फुलधारणा अथवा कळी अवस्थेत (घडाच्या सुरुवातीची अवस्था) तिसऱ्या पुर्ण विकसित झालेल्या पानाच्या मध्यशिरेसह २० चौ. सें.मी. चौरस आकाराचा भाग |
| आंबा | ४ ते ७ महिन्याच्या वयाचे जुने पान फांदीच्या मध्य भागातून नमुन्यासाठी घ्यावे |
| ऊस | ऊसाच्या शेंड्याकडून ३ रे पान लागवडीनंतर ३ ते ५ महिन्याने घ्यावे. |
| टोमॅटो | टोमॅटो पिकाच्या फुलधारणा अवस्थेच्या मध्यावधीमध्ये (फुलधारणेपासुन ८ ते १० दिवसांनी) फुलांच्या शेजारील पाने नमुन्यासाठी घ्यावीत. |

## पान देठ परिक्षण खत शिफारशी मध्ये मदत करते काय ?

सर्वसाधारणपणे पानदेठ (पेटिओल) परीक्षणामुळे चालू हंगामातील पिकाच्या सद्यस्थितीतील अन्नद्रव्यांची उपलब्धता कळते व त्यावरून आढळून आलेल्या अन्नद्रव्यांची कमतरता, योग्य ती खत मात्रा देऊन भरून काढणे सहज शक्य होते.

## पान देठ परीक्षणाचा नमुना कशा पद्धतीने वेष्टण (पॅक) करून प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवावा ?

आपण घेतलेले पान व देठांचे नमुने स्वच्छ (अगोदर न वापरलेल्या) कागदी पिशवीत वेष्टण (पॅक) करावीत जेणेकरून नमुना दुषित होणार नाही. नमुन्यावरती योग्य लेबल तसेच सोबत जोडावयाचा अग्रीमेंट फॉर्म सुवाच्य अक्षरात भरावा.

- नमुना घेतल्यापासून पॅकिंग केलेला नमुना ३ ते ४ दिवसांत प्रयोगशाळेत पोहचेल ही खबरदारी घ्यावी.

## पान देठ तपासणीसाठी पिकांमधील कोणती प्रमाणके (पॅरामीटर्स) तपासण्यात येतात ?

आपण पाठविलेले पान व देठांचे नमुने तपासले जाऊन त्यामधील एकुण नत्र, स्फुरद, पालाश, कॅल्शिअम, मॅग्नेशियम, गंधक, जस्त, मंगल, लोह, तांबे, बोरॉन तसेच मोलाब्द यांचे प्रमाण तपासले जाते.

## आपण पाठविलेले पान देठ नमुने कोणत्या प्रयोगशाळेत तपासले जातात?

पुण्यातील महाधनच्या डायग्नोस्टिक प्रयोगशाळेत सर्व अन्नद्रव्यांचे व इतर घटकांचे विश्लेषण केले जाते. वर उल्लेखित अन्नद्रव्यांच्या व्यतिरिक्त, इतर अनेक घटकांच्या विश्लेषणासाठी आमची लॅब अतिशय सुसज्ज आहे. तथापि, कोणत्याही विशिष्ट घटकांच्या गुणवत्ता चाचणीसाठी आवश्यकतेनुसार योग्य त्या प्रयोगशाळेची शिफारस केली जाऊ शकते

**ग्राहकसेवेचा भाग म्हणून आपण वरील माहिती जास्तित जास्त ग्राहक/ शेतकऱ्यांपर्यंत पोचवून त्यांना वनस्पती पान देठ (पेटीओल) परीक्षण करण्यास प्रवृत्त करावे.**